Review Of Research
Vol. 3 | Issue.6 | March.2014
ISSN:-2249-894X Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# जागतिकीकरणाचे भारतीय शेती विकासावरील परिणाम

**प्रा.डॉ. व्हनबिंदगे विठ्ठल परसप्पा**
**छ. शिवाजी वरिष्ठ रात्र महाविद्यालय, सोलापूर.**

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेला विकासाची गती देता यावी यासाठी भारताने नियोजना अंतर्गत पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्या नुसार सन १९५० ते १९९० या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा वृध्दी दर ३ ते ३.५ % राहिला. हा दर वृध्दीगत व्हावा. यादृष्टीने प्रयत्न चालू असताना सन १९९० ते १९९२ या काळात देशात आर्थिक अरिष्ट (Economic Crisis) निर्माण झाले. यातून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी सन १९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक नीतीचा (New Economic Policy) अवलंब केला. या धोरणाच्या अंतर्गत खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण म्हणजेच खाऊजा अवलंब करण्यात आला. विशेषत: खाजगीकरण आणि उदारीकरण यांचाअंतिम उद्देश हा जागतिकीकरण (वैश्विकरण - Globalisation) असाच निश्चित झाला. त्यामुळे जागतिकीकरणाद्वारे बाजारधिष्टित आर्थिक व्यवहाराला चालना देण्याचा आणि त्याद्वारे कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. वैश्विकरणामुळे जलद वाहतूक - दळवळणाच्या सोयीमुळे आणि माहिती तंत्रज्ञानामुळे जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत कोणतीही वस्तू वा सेवा उत्पादन करणे या त्याची विक्री करणे शक्य झाले आहे. याचाच अर्थ जागतिकीकरणामुळे जग हे आज Global Village झाले आहे.

जगदीश भगवती यांच्या मते, जागतिकीकरण ही देशाच्या अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी जोडणारी प्रक्रिया आहे. भिन्न देशानी एकत्र येऊन व्यापार व गुंतवणूक या वरील निर्बंध दूर करून आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यक्ति, वस्तू, सेवा, विचार आणि रितीरिवाज यांची सुलभ देवाणघेवाण होणे या सर्व गोष्टी जागतिकीकरणाच्या प्रक्रिमेध्ये अभिप्रेत असतात. थोडक्यात देशादेशातील मुक्त स्पर्धेला उत्तेजन देऊन नव्या तंत्राज्ञानाच्या वापराने उत्पादकता व उत्पादन वाढविणे आणि संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हा प्रमुख उद्देश जागतिकीकरणाचा असतो. त्यामुळे अशा जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवर कोणते बदल घडून आले. त्याचा उहापोह करण्यात आला आहे.

**जागतिकीरणाचे भारतातील कृषी विकासावर झालेले परिणाम :-**

१९९४ मध्ये गॅट करारात प्रथमच कृषी व्यापाराचा समावेश करण्यात आला या कराराची अंमलबजावणी करण्यासाठी जागतीक व्यापार संघटनेची स्थापना १ जानेवारी १९९५ रोजी करण्यात आली व भारत या संघटनेचा सभासद आहे. कृषी व्यापाराच्या कराराचा मुख्य उद्देश म्हणजे कृषी व्यापारातील विक्षेप दुर करून सर्व राष्ट्रांना समान संधी उपलब्ध करुन देणे हा आहे. कृषी मालाच्या अंतर्गत व अंतरराष्ट्रीय व्यापारावरील बंधणे कमी करून कृषी व्यापार मुक्त करणे. कृषी आदानावर दिली जाणारी सबसीडी कमी करणे, घरगुती आधार कमी करणे, निर्यात अनुदाने कमी करणे, जकातीचे दर समान पातळीवर आणणे या तरतुदी कृषी संबंधीच्या करारात आहेत. परंतु प्रत्यक्षात अनेक विकसीत राष्ट्रे ही कृषी व्यापार कराराचे उल्लंघन करुन

अविकासीत देशाच्या कृषी व्यापारात अडथळे निर्माण करत असल्याचे दिसून येते. भारतामध्ये कृषी व्यावसायात काही घटकांची अनुकुलता (वातावरण व स्वस्थ श्रम शक्ती) असल्यामुळे जागतीकरणात कृषी क्षेत्राला मोठया संधी उपलब्ध होतील असे वाटत होते. परंतु प्रत्यक्षात परिणाम मात्र उलट दिसून येतात.

**जागतिकीकरण व कृषी क्षेत्र :**

कोणत्याही राष्ट्राचा आर्थिक विकास होत असताना कृषी क्षेत्रात होणारे परिवर्तन अटळ असते. आज प्रगतशील असणारे देश हे कृषी प्रधान अर्थव्यवस्थेच्या टप्प्यामधून गेलेले आहेत. सुमारे शंभर वर्षापुर्वी अमेरिकेतल जवळजवळ ४० टक्के लोक कृषी क्षेत्रात होते. आज ही संख्या ३ टक्क्याहुनही कमी आहे. हीच गोष्ट इतर प्रगत देशाची आहे. यावरून एखाद्या देशाचा विकास होत असताना कृषी क्षेत्रातून औद्योगिक क्षेत्रात जनसंख्येचे सामावले जाणे आवश्यक असते. यावरून ज्या देशात कृषीवर अवलंबून असलेल्या लोकांचे प्रमाण कमी ते राष्ट्र श्रीमंत म्हणून ओळखली जातात. याउलट ज्या देशात कृषी क्षेत्रावर अधिक लोकसंख्या विसंबून असते अशा राष्ट्रांना गरीब राष्ट्र असे म्हणतात. स्वातंत्र्योत्तर काळात आपण नियोजनांच्या माध्यमातून विकासासाठी प्रयत्न केले. भारतीय अर्थव्यवस्थाविकासाच्या अनेक टप्प्यातून जाज असल्याचे दिसुन येते. पन्नासीच्या दशकात रचनात्मक सुधारणा, सत्तरीच्या दशकातील हरीतक्रांती, ऐंशीच्या दशकानंतरची बिकट स्थिती, व नव्वदीच्या दशकातील नवीन आर्थिक धोरण जे जागतिकीकरण व उदारीकरणाच्या स्वरूपात आहे. आज दीड दशकांच्या कालावधीचा टप्पा पुर्ण होत आहे अशा वेळी भारतीय कृषी क्षेत्रावची स्थिती कशी आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न या अभ्यासातून केलेला आहे.

आज ही भारतातील ६० टक्के पेक्षा लोकसंख्या कृषीवर आधारलेली आहे. याचा अर्थ लोकसंख्येचा मोठा हिस्सा कृषीवर विसंबून आहे. परंतु देशाच्या एकुण राष्ट्रीय उत्पादनात कृषीचा वाटा फक्त २२ टक्के आहे. यावरुन कृषीवर विसंबुन असलेल्या लोकांचे प्रमाणे अधिक असल्यामुळे भारताची विकासाची पातळी लक्षात येते. ६० टक्के लोकांचा राष्ट्रीय उत्पादनातील वाटा २२ टक्के व ४० टक्के लोकांचा राष्ट्रीय उत्पादनातला हिस्सा ७८ टक्के आहे. अर्थव्यवस्थेत विकासाच्या बाबतीत विविध क्षेत्रामध्ये कमालीची विषमता दिसुन येते. नव्या आर्थिक धोरणाच्या अंतर्गत कृषी क्षेत्राची स्थिती अशी आहे हे जाणुन घेण्याचा प्रयत्न या शोध निबंधात करण्यात आला आहे. प्रथमतः उदारीकरणापुर्वी कृषी क्षेत्राची स्थिती व सुधारणा कालखंडातील कृषी क्षेत्राची स्थिती जाणुन घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच सुधारणा कालखंडात (१९९०-१९९१ ते २००३-२००४) या काळातील कृषीची आयात निर्यात व व्यापारतोल कसा आहे हे जाणून कृषी क्षेत्रावर जागतीकीकरणाचे काय परीणाम झालेले आहेत हे शेवटी स्पष्ट केले आहे.

**सुधारणा पुर्व कालखंड व सुधारणा कालखंडातील कृषी व्यापाराची स्थिती :**

भारतातील एकुण निर्यातीत एकुण क्षेत्राचा वाटा १९५०-५१ ते १९९९-९० (स्वातंत्र्योत्तर कालखंड) व १९९०-९१ ते २०००-०१ (सुधारणा कालखंड) या कालावधीत तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविला आहे. या तक्यातील आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, स्वातंत्र्योत्तर कालखंडात (१९५०-५१ ते १९८५-८६) मध्ये कृषी क्षेत्राची निर्यात वाढत असल्याचे दिसून येते. या सुधारणा कालखंडात १९५० - ५१ ते १९८५ - ८६ एकुण निर्यातीत कृषी निर्यातीचा हिस्सा ४८ टक्के ते ३० टक्के पर्यंत असा आहे. या उलट १९९०-९१ ते २०००-२००१ या सुधारणा कालखंड कृषी निर्यातीचा हिस्सा (२५.०२) कमी झालेला असून त्यात अनेक चढ उतार पहावयास मिळतात. सुधारणा पुर्व कालखंडातही एकुण निर्यातील कृषी क्षेत्राची घट पहावयास मिळते. परंतू सुधारणा कालखंडात कृषी क्षेत्राच्या घटीचे प्रमाण जास्त आहे. सुधारणा कालखंडात ही कृषी निर्यातीत घट होण्याचे दिसून येते. वास्तविक एखादया देशाचा विकास होत असताना कृषी क्षेत्राचा विकास होण आवश्यक आहे. भारतामध्ये राबविण्यात आलेल्या अनेक पंचवार्षिक योजनेत योजना अंतर्गत खर्चाशी कृषी व संबंधीत क्षेत्रावरील खर्चाची टक्केवारी तक्ता क्र.२ मध्ये दर्शविण्यात आली आहे. यात १९५१-५६ मध्ये एकुण योजनाअंतर्गत खर्चाशी कृषी संबंधित खर्चावर १४.९ टक्के खर्च केला आहे. सुधारणा पूर्व कालखंडात हे प्रमाणे १२ ते १३ टक्क्यांच्या दरम्यान आहे. सुधारणा कालखंडात योजनाअंतर्गत केलेल्या खर्चात कृषीवर केलेला खर्च फक्त ४.९ ते ५.९ टक्के या दरम्यान आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, कृषी क्षेत्रावर सरकारची गुंतवणुक दोन्ही कालखंडात तशी कमीच आहे. परंतु दोन्ही कालखंडाची तुलना केली असता सुधारणा कालखंडात १९९०-९१ ते २००१-२००२ कालखंडात कृषीवर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण वेगाने घटत गेल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रासाठी होणाऱ्या पतपुरवठयाची स्थिती तक्ता क्रमांक ३ मध्ये दर्शविली आहे. १९८२ ते २००३ या कालखंडात भारतातील बँकांनी केलेल्या एकुण कर्ज पुरवठयापैकी कृषी साठी केलेला कर्ज पुरवठा १६.११ टक्क्यावरुन ११.६५ टक्यापर्यंत कमी होत असल्याचे दिसून येते.

देशातील ६० टक्के हुन अधिक लोकांचे जीवन ज्या क्षेत्रावर अवलंबून आहे त्यासाठी करण्यात आलेला पतपुरवठा कमी दिसून येतो. सुधारणा कालखंडात तर त्यात अधिक वेगाने घट होत असल्याचे पहावयास मिळते.

वरील सर्व आकडेवारी वरून हे स्पष्ट होते की, स्वातंत्र्योत्तर कालखंडात शेती क्षेत्राच्या विकासाकडे शासनाचे तुलनेने दुर्लक्ष केलेले आहे. सुधारणा कालखंडात सरकारचा कल खाजगी करण्याकडे झुकल्यामुळे शेतीसारख्या क्षेत्रावर सार्वजनिक खर्चात अधिक घट झाल्याचे स्पष्ट होते. एखाद्या देशाचा विकास होत असताना व मुख्य कृषी व्यवसाय असलेल्या क्षेत्राकडे दुर्लक्ष केल्यामुळे या क्षेत्राची पिछेहाट झाल्याचे दिसून येते.

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी पुरेशा गुंतवणुकीची आवश्यकता आहे. अशा गुंतवणीकतून कृषी क्षेत्रासाठी व उत्पादन वाढीसाठी अनेक सोयी उपलब्ध होणे आवश्यक असते. उदा.सिंचन खते, बी - बियाणे, रस्ते, वाहतूक इ. परंतू पूरेशी गुंतवणुक न केल्यामुळे व सुधारणा कालखंडात त्याकडे अधिक दुर्लक्ष केल्यामुळे शती क्षेत्रातील निर्यात घटत गेली. तसेच शेती व्यवसायात भांडवल संययाची निर्मिती झाली नसल्यामुळे ही दिशा पहावयास मिळते. त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रासाठी पतपुरवठा करणाऱ्या संस्थांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. विकसीत देशात कृषीसाठी मोठया प्रमाणात पतपुरवठा केला जाऊन तो ४ टक्के दराने केला जातो. परंतु भारतात आजपर्यंत कृषीसाठी कर्ज पुरवठयाचे प्रमाणे कमी असून व्याजाचा दर १० टक्के ते ११ टक्के असल्याचे पहावयास मिळते. यामुळे देशाच्या एकूण कर्ज पुरवठयाचे प्रमाणे कमी असून व्याजाचा दर १० ते ११ टक्के असल्याचे पहावयास मिळते. यामुळे देशाच्या एकुण निर्यातीत सुधारणा कालखंडात कृषी क्षेत्राचा वाटा घटत असल्याचे स्पष्ट होते. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर विकसीत राष्ट्रातील स्पर्धा शक्ती व कृषी व्यापाराच्या अटी तेवढयाच जबाबदार आहेत.

**आर्थिक सुधारणा कालखंड व भारतातील कृषी व्यापारतोल :**

भारताने उदारीकरणाचे धोरण स्विकारल्यानंतर आंतरराष्ट्रीय कृषी क्षेत्रासाठी अनेक संधी उपलब्ध होतील असे अनेक तज्ञांकडून बोलले जात होते. यामुळे भारताने खुल्या व्यापाऱ्याचे धोरण स्विकारले. भारतीय कृषीच्या बाबतीत अनुकूल वातावरण व स्वस्त मनुष्यबळ असल्यामुळे कृषीमध्ये तुलनात्मक खर्च कमी होईल व त्याचा फायदा आंतरराष्ट्रीय व्यापारात मिळेल असे वाटत होते. परंतु गेल्या १.५ दशकाच्या कालखंडात कृषी व्यापाराच्या बाबतीत निराशा झाल्याचे जाणवते. उदारिकरणाच्या पूर्व कालखंडात कृषी निर्यात ही आयातीपेक्षा ४ पटीने जास्त आहे. परंतु शेवटी २००३-०४ या वर्षात कृषी निर्यात ही कृषी आयातीपेक्षा १.५ पटीने जास्ती आहे. याचा अर्थ उदारिकरणाच्या धोरणाचा परिणाम कृषी निर्यातवाढीमध्ये न होता कृषी आयातीचे प्रमाण वाढण्यामध्ये दिसून येते. यावरुन हे स्पष्ट होते की, खुल्या व्यापाराचे धोरण स्थिरावल्यावर कृषी निर्यातीपेक्षा कृषी आयातीचा वेग जास्त आहे. यामुळे भारतीय कृषी व्यापार तोलावर परीणाम झाल्याचे दिसून येते.

**जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम :-**

**कृषी उत्पादन :-** जागतिकीकरणात भारतीय शेती क्षेत्राच्या विकासाचा विचार केला असता. अनेक संशोधकांनी केलेल्या अभ्यासात खुल्या व्यापाराच्या धोरणाचे भारतीय शेतीवर अनेक अनिष्ट परिणाम झाल्याचे दिसून येते. सन १९९०-९१ ते २००४-०५ या कालावधीत देशातील एकूण घरगुती उत्पादनात शेती क्षेत्राचा हिस्सा कमी होत असल्याचे दिसते. १९५१-५२ एकूण उत्पादनात कृषी क्षेत्राचा वाटा ५६ टक्क्यावरुन २२ टक्क्यापर्यंत कमी झाला आहे. म्हणजेच उदारीकरणाचे धोरण स्विकारल्यामुळे या कालावधीत शेती क्षेत्रात सार्वजनिक गुंतवणुक व खर्चाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येत आहे. कृषी उत्पादन वाढीचा दर सुधारणा पूर्व कालखंडात ४ टक्के होता. तो आज जवळपास २ टक्केच्या आसपास आहे.

**कृषी सवलतीचा परिणाम :-** कृषी संबंधीचा करारातील तरतुदीनुसार भारतासारख्या देशांना शेतीच्या स्थुल घरगुती उत्पादनाचे १० टक्के अनुदान कृषी क्षेत्रात देता येते. विकसित देशासाठी हे प्रमाण ५.२ प्रतिशत ठेवता येते. याबाबतीत भारतात या धोरणाचे काटेकोरपणे पालन केले आहे. कृषी सबसीडीच्या संदर्भात विकसित व अविकसित देशामध्ये खुप वाद-विवाद झाले. यात अविकसित देशाने एकत्रित येऊन विकसित देशांच्या या धोरणाचा तिव्र विरोध केला.

**कृषीतील रोजगार पातळी :-** जागतिकीकरणाचा भारतीय कृषीतील रोजगारीवर अनेक लोकांनी अभ्यास केला. काही संशोधकांच्या मते ग्रामीण भागात रोजगार वाढीचा दर १९८३-८४ या कालखंडात प्रति वर्षी २.३४ टक्के होता. तर तो १९९४-२००० मध्ये ०.६७ टक्के इतका खाली आला. यावरुन जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात बेकारी वाढल्याचे दिसून येते.

**दारिद्र्यावर परिणाम :-**

जागतिकीकरणामुळे भारतीय दारिद्र्यावरदेखील परिणाम झाल्याचे दिसून येते. सुधारीत निर्देशात १९९० च्या दशकात भारतातील शहरी व ग्रामीण भागातील दारिद्र्यामध्ये घट झाल्याचे दिसून आले आहे. या तुलनेने शहरी भागातील दारिद्र्यातील घट ग्रामीण भागापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.

**संदर्भ सुची :-**

१) जयंत पाटील जागतिकीकरण व ग्रामीण अर्थव्यवस्था, अर्थमंथन, जुन २००४.
२) WTO Reports, २०००-२००३, Palak Publication, Mumbai २००३.
३) डॉ.भारत खंदारे, जागतिकीकरण, कृषी क्षेत्रावरील अरिष्ठ, अर्थबोध, फेब्रु.२००५.
४) Dr.V.B.Bhise (२००६) जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम, अर्थबोध, मार्च २००६.